रत्नागिरी जिल्ह्यातील खेड येथे दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) हे न्यायालय स्थापन करण्याबाबत व त्याकरीता आवश्यक पदे निर्माण करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
शासन निर्णय क्रमांक : सीआरसी-०४१७/३१८/प्र.क्र.१३५/का-११.
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई. ४०० ०३२.
दिनांक : ९ मे, २०१८.

संदर्भ -:**१.** मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र क्र.बी(डब्ल्यू)ए१२१८/१९९०/ ९७३/ १२३६४/२०१७, दि.२७/०४/२०१७.
२. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, रत्नागिरी यांची क्र. आस्था.ब ४/३१८१/२०१७, दि.१४/६/२०१७ व क्र. प्रशा ब ४/५८५५/२०१७, दि.८/११/२०१७ ची पत्रे.
३. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे क्र.पदनि-२०१८/प्र.क्र.३५/१८/आ.पु.क., दि.२५/४/२०१८ रोजीचे पत्र.(पदनिर्मितीबाबत कार्यवृत्त)

प्रस्तावना :

खेड जि. रत्नागिरी येथे दिवाणी न्यायाधीश(वरिष्ठ स्तर) हे न्यायालय स्थापन करण्यासाठी, मा. उच्च न्यायालयाच्या धोरणानुसार आवश्यक सर्व निकष जसे की, राज्यातील विविध ठिकाणी न्यायालय सुरु करण्यासाठी प्रलंबित खटले / प्रकरणांची किमान संख्या ५०० असावी, त्याचबरोबर पायाभूत सुविधा उदा. न्यायालयीन इमारती आणि न्यायाधीशांची निवासस्थाने यांची उपलब्धता असावी, इत्यादी निकष पूर्ण होत असल्याने मा. उच्च न्यायालयाच्या “न्यायालय स्थापना समितीने” खेड जि. रत्नागिरी येथे दिवाणी न्यायाधीश, (वरिष्ठ स्तर) स्थापन करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुषंगाने मा. उच्च न्यायालयाने दि.२७/४/२०१७ रोजी खेड, जि.रत्नागिरी येथे दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर) स्थापन करणे आणि सदर न्यायालयासाठी पदे निर्माण करण्याचा प्रस्ताव संदर्भिय अनुक्रमांक १ येथील पत्रान्वये शासनास सादर केला आहे. तर उच्चस्तरीय सचिव समितीने सदर न्यायालयासाठी २० पदे(१८ नियमित व २ बाह्ययंत्रणेद्वारे) निर्माण करण्यास संदर्भिय अनुक्रमांक ३ येथील पत्रान्वये मान्यता दिली आहे. त्यानुसार सदर न्यायालय स्थापन करण्याची व त्यासाठी पदनिर्मिती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

रत्नागिरी जिल्ह्यातील खेड येथे दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) हे न्यायालय स्थापन करण्यास व त्याकरीता पुढिल विवरणपत्रात दर्शविल्यानुसार आवश्यक २० पदे (१८ नियमित व २ बाह्ययंत्रणेची पदे) न्यायालय सुरु होण्याच्या दिनांकापासून निर्माण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

रत्नागिरी जिल्ह्यातील खेड येथील दिवाणी न्यायधीश (वरिष्ठ स्तर)
या न्यायालयासाठी आवश्यक पदे (अस्थायी)

अ.क्र.	पदनाम	वेतनश्रेणी	पदसंख्या
१	दिवाणी न्यायाधीश (वरीष्ठ स्तर)	३९५३०-९२०-४०४५०-१०८०-४९०९०-१२३०-५४०१०	१
२	लघुलेखक (नि.श्रे.)	९३००-३४८०० + ग्रेड पे ४३००	१
३	अधिक्षक	९३००-३४८०० + ग्रेड पे ४६००	१
४	सहायक अधिक्षक	९३००-३४८०० + ग्रेड पे ४४००	२
५	वरिष्ठ लिपिक	५२००-२०२०० + ग्रेड पे २४००	२
६	कनिष्ठ लिपिक	५२००-२०२०० + ग्रेड पे १९००	६
७	बेलिफ	५२००-२०२०० + ग्रेड पे १९००	३
८	शिपाई	४४४०-७४४० + ग्रेड पे १३००	२
९	पहारेकरी	----	१ बाह्ययंत्रणेद्वारे
१०	सफाईगार	----	१ बाह्ययंत्रणेद्वारे

२. यावरील खर्च मागणी क्र.जे-१, २०१४ न्यायदान, १०५- दिवाणी व सत्र न्यायालय, (०२)जिल्हा व सत्र न्यायाधीश,(०२)(०१) जिल्हा व सत्र न्यायाधीश (अनिवार्य) (२०१४ ०१७२) या लेखाशीर्षाखाली मंजूर होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावा. या अनुषंगाने निधी उपलब्धतेबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक ११२४/व्यय-५, दि.२९/११/२०१७ व अनौपचारीक संदर्भ क्रमांक १७०/आपुक, दि.०७/०३/२०१८ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०५१०१५१२३९१५१२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

Amogh
Shyamkant Kaloti

Digitally signed by Amogh Shyamkant Kaloti
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law and Judiciary Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1f733daf00a6028414c43d0cc10d82acab3b732c4edd56e818f8a3b355588753, serialNumber=9ebeebf21dc54ceec51e6d5ffc84bb94ca6af89497279007d66e97dc13547037, cn=Amogh Shyamkant Kaloti
Date: 2018.05.10 15:12:35 +05'30'

(अ. श्या. कलोती)
विधि सल्लागार नि सह सचिव,

प्रति,

१. मा. राज्यपालांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. विरोधी पक्ष नेता, विधानसभा/ विधानपरिषद
४. सर्व विधानमंडळ सदस्य, विधानमंडळ, मुंबई.
५. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक मंत्रालय, मुंबई.
६. मा. राज्यमंत्री,विधि व न्याय यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
७. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
८. महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई.
९. प्रबंधक (निरीक्षणे -१), उच्च न्यायालय(अ.शा), मुंबई.(पत्राने)
१०.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, रत्नागिरी.
११.महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई.
१२.जिल्हा कोषागार अधिकारी, रत्नागिरी.
१३.वित्त विभाग, कार्यासन - व्यय-५/ आ.पु.क., मंत्रालय, मुंबई.
१४.विधि व न्याय विभाग, कार्या-१२,१३,२३ व २४ मंत्रालय, मुंबई.
१५.निवडनस्ती/ कार्या-११.

****